महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमीकडुन सन २०१९-२० या आर्थिक वर्षात राबविण्यात येणा-या विविध योजनांच्या खर्चासाठी (कार्यक्रमांतर्गत) प्रशासकीय मान्यता .

**महाराष्ट्र शासन**
**अल्पसंख्याक विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : पंजाबी -२०१९/प्र.क्र. ४/ पंसाअ /का-५**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ००३२**
**दिनांक:- ०३/०८/२०१९**

वाचा :-

१) अल्पसंख्याक विकास विभाग , शासन निर्णय क्रमांक : पंसाअ-२०१७/प्र.क्र.१७६/का-४, दि.५.१०.२०१८

२) वित्त विभाग , शासन परिपत्रक क्रमांक : : अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थसंकल्प-३ दि.८.७.२०१९

**प्रस्तावना :-**

राज्यात पंजाबी भाषेचा विकास, संवर्धन, प्रगती तसेच पंजाबी व मराठी भाषेतील साहित्यिकांमध्ये वैचारिक आदान प्रदान होऊन राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ व्हावी या उद्देशाने महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमीची स्थापना संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. पंजाबी साहित्य अकादमीमार्फत राबविण्यात येणा-या योजना निश्चित करण्यात आलेले असून सदर योजनांची पुर्ण क्षमतेने अंमलबजावणी करण्याकरिता सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमीकरिता रु.१५,००,०००/- (रूपये पंधरा लाख फक्त) इतकी **कार्यक्रमांतर्गत** तरतूद मंजूर करण्यात आलेली आहे. वित्त् विभागाच्या संदर्भ क्र. २ दि.८.७, २०१९ च्या परिपत्रकानुसार मंजूर तरतूदीच्या ऑगस्ट्, २०१९ ते डिसेंबर,२०१९ या ५ महिन्याकरिता ६०% इतक्या मर्यादेत खर्च करण्यास उपलब्ध करुन देण्यात आल्यानुसार वितरणेसाठी रक्कम रु.९,००,०००/- (रुपये नऊ लाख फक्त) इतक्या रक्कमेच्या मर्यादित दि.५.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या योजनांसाठी खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमीकडून सन २०१९-२० या आर्थिक वर्षात दि.५.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या विविध योजनांच्या खर्चासाठी **कार्यक्रमांतर्गत** अर्थसंकल्पित रु.१५,००,०००/- (रूपये पंधरा लाख फक्त्) इतक्या तरतूदीतून वित्त विभागाच्या संदर्भ क्र.२ च्या परिपत्रकानुसार ऑगस्ट्, २०१९ ते डिसेंबर,२०१९ या ५ महिन्याच्या कालावधीकरिता रक्कम रु.९,००,०००/- (रुपये नऊ लाख फक्त) इतक्या मर्यादेत रक्कम खर्च करण्यास महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमीस खालीलप्रमाणे खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | योजना व उद्दीष्टये | दि.५.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये पुर्नविलोकीत केल्यानुसार मंजूर करण्यात आलेली रक्क्म रुपये | सन २०१९-२० या वर्षा करिता करावयाच्या कार्यक्रमानुसार प्रस्तावित रक्क्म रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | **संत गुरुनानकचा साहित्यिक शिकवण विषयावरील चर्चासत्र पंजाबी भाषेतील वाङ:मयीन व सास्कृतिक कार्यक्रम** | रु.३,००,०००/- | रु.३,००,०००/- | |
| २ | **पंजाबी सांस्कृतिक मेळावा** | रु.६,००,०००/- | रु.६,००,०००/- | |
| | **एकूण** | **रु.९,००,०००/-** | **रु.९,००,०००/-** | |

**२.** सदरहू रक्कम "मागणी क्र. झेडई-१,२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाज कल्याण,१९९ इतर  अशासकीय संस्थांना सहाय्य् कार्यक्रम -१-अल्पसंख्याकांना सहाय्य (०१) (०२) महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमीचे विविध योजनेसाठी सहाय्य्क अनुदान राज्य् (कार्यक्रम) (२२३५-सी-२१४ ) "या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्याखाली मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यास यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध् करण्यात आला असून त्याच्या संगणक संकेताक  २०१९०८०७११३८०३५८१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mahesh Sadashiv Choukekar

Digitally signed by Mahesh Sadashiv Choukekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=965737dc18a2c1fbaf047c7a9f61259e5c65db981c8eaaab6c983897e5318874, serialNumber=d8e4f67b3825f197df63f949fa4b661ca6c21333d9afdb92501b830b9d0ca5c6, cn=Mahesh Sadashiv Choukekar
Date: 2019.08.07 11:43:22 +05'30'

**(म. स. चौकेकर)**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र १/२,मुंबई/नागपूर ,
२. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १/२,मुंबई/नागपूर
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
५. अवर सचिव/कक्ष अधिकारी,(का-७/(का-५)/(का-२) अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. अधिक्षक नि कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमी, मुंबई.
७. निवड नस्ती (महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमी, मुंबई.)